The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मराठी संताचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व

**कु.मायावती जमधाडे**
श्री शिवाजी कॉलेज परभणी

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राला फार प्राचीन असा संतांचा इतिहास लाभलेला आहे. म्हणूनच महाराष्ट्राला संतांची भूमी असे देखील म्हटले जाते. अनेक संतांचा जन्म या महाराष्ट्र भूमीत झाला त्यामुळे भारतमध्ये विशेष असे स्थान प्राप्त झाले.

संतांमध्ये केवळ पुरुषच संत झाले असे नाही तर स्त्रियांना देखील यामध्ये संधी प्राप्त झाली होती. या सर्व संतांमुळे महाराष्ट्राला आणि मराठी भाषेला वाङ्मयाचा मोठा वारसा मिळाला आहे. संत आपल्या कार्यातून खूप साऱ्या गोष्टी करत असत. जसे संत हे चालते फिरते देवच मानले जातात. संतांना गुरुचा दर्जा प्राप्त झाला होता आणि त्या अर्थी त्यांना गुरु ही पदवी दिली जात होती. त्या अर्थी त्यांच्याकडून समाजाला शिकण्यासाठी बरेच काही असेल. धार्मिक क्षेत्र हे प्रमुख केंद्र होते. जवळपास सर्व संतासाठी मराठी संतांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व हे अतुलनीय स्वरूपाचे आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक संत होऊन गेले आहेत. जसे की संत ज्ञानेश्वर , संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामेळा, संत मुक्ताबाई , संत नरहरी सोनार, संत तुकाराम, समर्थ रामदास , गजानन महाराज, शिर्डीचे साईबाबा, संत गोरोबा , संत जनाबाई , संत कान्होपात्रा , संत सेना महाराज इत्यादी.

**मराठी संतांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व**

**१) संत चोखामेळा:** संत नामदेवांचे शिष्य हे संत चोखामेळा होते. ते यादव काळातील वारकरी संत होते. ते नित्यनेमाने व भक्तिभावाने पांडुरंगाचे नामस्मरण व गुण संकीर्तन करीत होते. ते शुद्र अतिशुद्र, गावगाडा , समाज जीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व व वर्ण-व्यवस्था यांच्या विळख्यात ते अडकले. दैन्य, दारिद्र, वैफल्य यामुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते. त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. संत चोखोबांनी भक्तिमार्गाचा संदेश आपल्या अभंगातून समाज बांधवांना दिला. संत चोखोबाचे श्री विठ्ठलावर अनन्यसाधारण प्रेम होते. एकादशीच्या सकाळी संता बरोबर चोखामेळा आपल्या कुटुंबासह भूलोकीच्या वैकुंठाला निघाले. पंढरपूरला आल्यावर पांडुरंगाच्या देवळाबाहेर उभे राहून दुरून दर्शन झाले. आणि ते सावळ्या परब्रम्हाच्या प्रेमात अडकून पडले. आणि त्यांनी ठरवलं की आता इथेच पंढरपूर चंद्रभागेत लांब जाऊन आंघोळ करून रोज महाद्वारापाशी येऊन विठ्ठलाला मनात आठवूण हृदयात साठवून लोटांगण घालावेत आणि एके रात्री अचानक पंढरीनाथ आले आणि म्हणाले 'चल माझ्यासोबत मी तुला मंदिरात नेतो' आणि क्षणार्धात चोखोबा आणि विठ्ठल गाभाऱ्यात आले. संत चोखोबा हे एक महान असे महार जातीमध्ये जन्माला आलेले एक संत विदर्भाच्या भूमीत होऊन गेले.

धाव घाली विठू आता | चालू नको मंद | बडवे मज मारीती | ऐसा काहीतरी अपराध ||
जोहार मायबाप जोहार | तुमच्या महाराचा मी महार|बहु भूकेला जाहलो | तुमच्या उष्ट्यासाठी आलो ||
आमुची केली हीन याती | तुझे का न कळे श्रीपती|जन्म गेला उष्टे खाता | लाज न ये तुमचे चित्ता ||
ऊस डोंगा परी | रस नोहे डोंगा | काय भुललासी वरलीया रंगा || चोखा डोंगा परी | भाव नोहे डोंगा ||
विठ्ठल विठ्ठल गजरी | अवघी दुमदुमली पंढरी ||

समाज जागृती आणि धार्मिक भावना या दोन्ही गोष्टी संत चोखामेळा यांनी अभंगांमध्ये वर्णन केलेल्या आहेत. समाजात असलेली जातीव्यवस्था ही देवाला सुद्धा नाकारता येऊ शकली नाही. देवांचे दर्शन घेणे किंवा देवांच्या जवळ जाणे हे देखील शूद्रांना किंवा महार समाज बांधवांना नाकारण्यात आलेले होते. समता, बंधुता, एकता या कुठेही पालन केलेले जात नव्हते. संत चोखोबांचे हे वरील अभंग आजही लोकप्रिय आहेत. या सर्वांचे विठ्ठलावर अनन्यसाधारण प्रेम होते. संत चोखोबा मंगळवेढ्याचे होते. त्यांना आयुष्यभर उपेक्षा मिळाली. त्यांना उपेक्षित बांधवांच्या उद्धाराची संतत काळजी वाटत होती. आपल्या बांधवांना समाज हक्क मिळावेत, समाजाची तेढ कमी व्हावी , जातीमधील संघर्षाची भ्रामक कल्पना नष्ट व्हावी यासाठी त्यांनी पूर्ण आयुष्यभर भक्तिमार्गाद्वारे प्रयत्न केले.

**२) संत गाडगेबाबा:** मराठी भाषेमधील गाडगेबाबा म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार संत व समाज सुधारक होते. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांमध्ये जात असत. त्यांची सामाजिक न्याय सुधारणा आणि स्वच्छता या विषयात जास्त रुची होती. विसाव्या शतकातील ते एक महान सुधारक होते. त्यांचे मूळ नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर होते. वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले ते समाज सुधारक होते. 'मी कोणाचा गुरु नाही मला कोणी शिष्य नाही असे ते कायम म्हणत. संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महान व्यक्तींमध्ये घडलेला हा एक प्रसंग आहे. जेव्हा गाडगेबाबांची प्रकृती ठीक नव्हती. महानंदसामी नावाच्या त्याच्या चाहत्याने मुंबईत आलेल्या डॉ. आंबेडकरांना गाडगेबाबांची बातमी दिली. डॉ. बाबासाहेब तेव्हा भारताचे कायदेमंत्री होते आणि त्यांना संध्याकाळच्या ट्रेनने दिल्लीला रवाना व्हायचे होते. बाबांचा निरोप मिळताच त्यांनी सर्व कामे बाजूला ठेवली. घोंगड्या विकत घेऊन ते महानंदस्वामी सह रुग्णालयात गेले. कोणाकडून काही न घेण्याऱ्या बाबांनी डॉ.बाबासाहेबांकडून दोन घोंगड्या स्वीकारल्या. पण म्हणाले "डॉक्टर तुम्ही कशाला आले? मी एक फकीर तुमचे एक मिनिट महत्त्वाचे आहे तुमचा किती मोठा अधिकार आहे. तेव्हा डॉ.बाबासाहेब म्हणाले "बाबा माझा अधिकार दोन दिवसाचा उद्या खुर्ची गेल्यावर मला कोणी विचारणार नाही. तुमचा अधिकार मोठा आहे. याप्रसंगी डॉ.बाबासाहेब यांच्या डोळ्यात अश्रू होते. कारण असा प्रसंग पुन्हा जीवनात येणार नाही हे दोघेही जाणत होते. महाराष्ट्र मध्ये पंढरपूर, नाशिक, देहू

,आळंदी या तीर्थक्षेत्र ठिकाणी बाबांनी स्वतः राबवून कष्ट करून मदत मागून धर्मशाळा बांधल्या. काही नद्यावर घाट बांधले, पाणपोया उघडल्या, गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी सुरू केली. मुलांसाठी शाळा, महाविद्यालये, वस्तीगृहे उभी केली. दु:ख दिसले की बाबा तिथे धावत. दुष्काळ पडला , लोक अन्नान झाले की बाबा तिथे हजर. स्वतः राबायचे लोकांनाही सेवेची प्रेरणा द्यायचे. समाजातील सर्व घटकांची सेवा त्यांनी अगदी मनोभावे केली होती. जी आजही महत्त्वाची आहे. समाजातील स्त्री पुरुष या सर्वांची त्यांनी समाजकार्यातून प्रबोधन देखील केले होते.

त्यांचा देव म्हणजे अनाथ, अपंग, दरिद्री व दु:खी लोक. रंजल्या गांजलेल्यांची सेवा हीच बाबाची देवपूजा. त्यांनी अनेक विचार समाजाला दिलेली आहेत. जसे की 'दगडात देव नाही तर देव माणसात आहे.' 'विद्या शिका आणि गरिबांचे विद्येसाठी मदत करा.' 'माणसाने माणसाबरोबर माणसासारखे वागावे हाच बोध मी ग्रहण केला आहे.' 'धर्माच्या नावाखाली कोंबड्या बकऱ्या सारखे मुके प्राणी बळी देऊ नका.' 'दान घेण्यासाठी हात पसरू नका, दान देण्यासाठी हात पसरा'. गाडगे महाराजांचे विचार आजही लागू पडतील असे आहेत. हा महान संत या भूमीवर झाला आणि त्यांनी जे कार्य केलेले आहे ते अमूल्य आहे.

**समारोप:**

पंढरीचा विठोबा हे सर्व संताचे श्रद्धास्थान आहे. समाजात त्यांनी विविध बदल केले होते ज्यावेळी जातीभेद, उच्चनीच, गरीब, श्रीमंत यांची मोठी भिंत समाजात उभी होती. त्यावेळी विविध जातील जन्माला आलेल्या संतांनी हे विषमतेची भिंत पाडण्याचे मोठे काम केले. संपूर्ण भारतात त्यांनी कार्य केलेले आहेत. जे आजही समाजासाठी आदर्श आहेत व त्यांच्या विचारांवर व कार्यावर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. सर्व प्रकारचे भेद नष्ट करणे व सर्वांचे समाज संधी देणे.

देवासाठी सर्व समान असावेत व सर्वांना त्याची सेवा करण्याची संधी द्यावी यासाठी काही संतांनी कार्य केलेले आहे. तोच विचारांचा वारसा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भारतीय संविधानात लिहून खऱ्या अर्थाने सर्व संतांना आदरांजली दिलेली आहे आणि त्याचे कार्य जे समाजासाठी होते ते कायद्याच्या स्वरूपात निर्माण केलेले आहे. म्हणून कळत नकळत सर्व भारतीच्या या सर्व महान संतांचे विचार आपल्या जीवनात समाविष्ट झालेले आपणास आढळून येतील. संतांचे कार्य हे देवासाठी व जे वंचित लोक आहेत त्यांच्यासाठी प्रामुख्याने आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. नसीराबादकर ल.रा.- प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2. अ. ना. देशपांडे - अर्वाचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, खंड-२

**मराठी संताचे व्यक्तितत्व आणि कर्तृत्व**

**कु.मायावती जमधाडे**